पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दि. १५/१०/२०१७

**पोलीस - नक्षल चकमकीत ७ लाखाचे बक्षिस असलेली एक जहाल महिला नक्षलवादी ठार**

- **हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त**

उपविभाग धानोरा अंतर्गत कोरची तालुक्यातील ग्यारापत्ती पोलीस मदत केंद्र सीमेवर टवे गावच्या हद्दीत येणाऱ्या जंगल परीसरात गडचिरोली पोलीस नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना काल दिनांक १४/१०/२०१७ रोजी दुपारी ०४.०० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक झाली.

मौजा टवे गाव जंगल परीसरात पोलीस पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या अज्ञात नक्षलवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जिवे मारण्याच्या उददेशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकी दरम्यान एका जहाल महिला नक्षलवादीला कंठस्नान घालण्यात पोलीस दलाला यश प्राप्त झाले. नक्षलवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

चकमकीनंतर शोधमोहीम राबविली असता एक जहाल महिला नक्षलवादीचा मृतदेह व ०१ रायफलसह मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात आले. मिळुन आलेल्या मृत महिला नक्षलवादीची ओळख पटली असून सदर नक्षलवादी महिलेचे नाव सोनी, वय-३५ वर्ष, रा. कुंता एरिया जि. बिजापुर सदर नक्षलवादी महिला ही टिपागड एलओएस मधील एरिया कमिटी मेंबर असून तीच्यावर ०७ लाखाचे बक्षिस आहे. चकमकी नंतर पोलीस पथकांनी घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावर ८ एमएम रायफल, १८ जिवंत काडतुस, ब्रास्टींग साहित्य व नक्षल लिखीत पुस्तके तसेच मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात गडचिरोली पोलीसांना यश आले आहे.

चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे.

